**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अन्वये पुरावा.</u>**

नियमीत फौ.ख.क्र. ०९/२०११
सरकार विरुध्द अरविंद
निशाणी क्रमांक -२४

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव -हरीभाऊ मारोतराव शिसौदे ,
वय – ४८ वर्षे धंदा - नोकरी
रा. अहमदपूर, ता.अहमदपूर, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे.</u>**

**१.** मी महेश नागरी सहकारी पतसंस्थेत सन २००८ पासून नोकरी करीत आहे. मी या घटनेच्या वेळी शाखा व्यवस्थापक म्हणून अहमदपूर कार्यालयात कार्यरत होतो. आरोपी अरविंद पौळ हा शिपाई म्हणून अहमदपूर शाखेत कार्यरत होता. आमचे पतसंस्थेत एम.एस.ई.बी. वीज बील भरणा केंद्र होते. पतसंस्थेत वीज बीलाची जमा झालेली रक्कम एम.एस.ई.बी.चे खाते असलेल्या स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद शाखा अहमदपूर येथे नियमीतपणे भरणा केली जात असे. दि.२९/०९/२००९ रोजी जमा झालेली वीज बीलाची रक्कम रुपये १,५९,२२०/- एम.एस.ई.बी.चे खाते असलेल्या स्टेट बॅक ऑफ हैद्राबादमध्ये जमा करणेकामी आरोपीचे ताब्यात देण्यात आली. आरोपीने सदरची रक्कम बॅकेत न भरता हैद्राबाद बॅकेचे चलनवर खोटा शिक्का मारला व खोटी पावती संस्थेकडे जमा केली. सदरची रक्कम एम.एस.ई.बी.चे खात्यात जमा न झाल्याची माहिती एम.एस.ई.बी.ने आमचे पतसंस्थेला खुलासा मागितल्यानंतर निर्दशणास आली. त्यानंतर मी आरोपीविरुध्द रक्कमेचा अपहार केला म्हणून फिर्याद नोंदविली. आता मला फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादीला **<u>नि.क्र.२५</u>** देण्यात येते. मी पोलिसांना आरोपीने दिलेली खोटी पावती दिली होती. आता मला ती पावती दाखवली. तीच मी पोलिसांकडे तपासाच्या दरम्यान दिली होती. पावतीला **<u>नि.क्र.२६</u>** देण्यात येते. पोलिसांनी बॅकेत येवून घटनास्थळाचा पंचनामा केला होता. आरोपी न्यायालयात हजर नाही. त्याला पाहिल्यास

ओळखू शकतो. घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच नामे रमेश पंढरीकर मोघेकर हे पीगमी एजंट म्हणून काम करीत होते, ते आजरोजी हयात नाहीत.

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अन्वये पुरावा असल्यामुळे उलटतपास नाही.**

समक्ष,

स्वाक्षरीत/-

**(आर.डी.वाबळे)**

दिनांक - २६/०२/२०२६

अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अन्वये पुरावा.</u>**

नियमीत फौ.ख.क्र. ०९/२०११
सरकार विरुध्द अरविंद
निशाणी क्रमांक -२७

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव -संतोष शिवाजीराव सुर्यवंशी,
वय — ३८ वर्षे धंदा - नोकरी
रा. अहमदपूर, ता.अहमदपूर, जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे.</u>**

**१.** मी महेश नागरी सहकारी पतसंस्थेत सन २००८ पासून नोकरी करीत आहे. मी या घटनेच्या वेळी कॅशियर म्हणून अहमदपूर कार्यालयात कार्यरत होतो. आरोपी अरविंद पौळ हा शिपाई म्हणून अहमदपूर शाखेत कार्यरत होता. आमचे पतसंस्थेत एम.एस.ई.बी. वीज बील भरणा केंद्र होते. पतसंस्थेत वीज बीलाची जमा झालेली रक्कम एम.एस.ई.बी.चे खाते असलेल्या स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद शाखा अहमदपूर येथे नियमीतपणे भरणा केली जात असे. दि.२९/०९/२००९ रोजी जमा झालेली वीज बीलाची रक्कम रुपये १,५९,२२०/- एम.एस.ई.बी.चे खाते असलेल्या स्टेट बॅक ऑफ हैद्राबादमध्ये जमा करणेकामी आरोपीचे ताब्यात देण्यात आली. आरोपीने सदरची रक्कम बॅकेत न भरता हैद्राबाद बॅकेचे चलनवर खोटा शिक्का मारला व खोटी पावती संस्थेकडे जमा केली. सदरची रक्कम एम.एस.ई.बी.चे खात्यात जमा न झाल्याची माहिती एम.एस.ई.बी.ने आमचे पतसंस्थेला खुलासा मागितल्यानंतर निर्दशणास आली. आरोपीने सदर रक्कमेचा अपहार केला होता. आरोपी न्यायालयात हजर नाही. त्याला पाहिल्यास ओळखू शकतो.

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अन्वये पुरावा असल्यामुळे उलटतपास नाही.</u>**

समक्ष,

स्वाक्षरीत/-
**(आर.डी.वाबळे)**
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक - २६/०२/२०२६